# बस स्थानक परिसरामध्ये गर्दीचा फायदा घेऊन हातचलाखीने सोन्या चांदीची दागिणे लांबविणारे पती-पत्नी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात.

फिर्यादी सौ. रत्नमाला पुरुषोत्तम गवई, रा. जुनी वस्ती सेवाग्राम, वर्धा ह्या त्यांचे पतीसह वर्धा बस स्टॉप येथून नागपूरला जाण्याकरीता बसमध्ये चढताना एक मोरपंखी साडी घातलेली सोबत लहान बाळ असलेली महिला ही फिर्यादी यांना मागून धक्का देत असल्याने तिला फिर्यादी यांनी हटकले नंतर फिर्यादी ह्या बसमध्ये बसून निघून गेल्या असता थोड्या वेळाने फिर्यादी यांना त्यांचे बॅगची चैन उघडी दिसली व त्यामध्ये ठेवलेली पर्स दिसली नाही सदर पर्समध्ये सोन्याचे दागिने, नगदी ८०००/- रु व १ जिओ कंपनीचा मोबाईल एकूण जुमला किंमत ३,५४,०००/- रु. चा माल बॅगमध्ये ठेवून असलेल्या चॉकलेटी रंगाचे पर्ससह चोरून नेल्याचे लक्षात आल्याने फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन वर्धा शहर येथे दिलेल्या तक्रारीवरून अप.क्र. १३८९/२०२१ कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखे मार्फत सुरु असतांना सतत पाठपुरावा करून तांत्रिक मुद्यांच्या आधारे आरोपीतांना निष्पन्न केले व गोपनीयरित्या सापळा रचून त्यांना चाणक्य नगर,वाघापूर, यवतमाळ येथून आरोपी १) सुर्या राजेश बोर्डे, वय ४० वर्षे, २) सौ सपना सूर्या बोर्डे, वय ३५ वर्ष दोन्ही रा. अर्धपूर जिल्हा नांदेड ह. मु. चाणक्य नगर वाघापूर, यवतमाळ यांना ताब्यात घेऊन त्यांचे कडून १) एक सोन्याचा तुटलेला गोफ - वजन १२.५८० ग्रॅम की. ५६,०००/- रु., २) एक सोन्याची चेन – वजन ६.९९० ग्रम की. ३१,०००/- रु., ३) तीन सोन्याच्या लहान मोठ्या अंगठ्या वजन ३.२४० ग्रॅम की. १४,०००/- रु, ५) सोन्याचे टॉप्स २ जोड – वजन २.८४० ग्रॅम की. १२,०००/- रु, ५) सोन्याचे लोकेट २ नग - वजन १.७८० ग्रॅम की. ६,०००/- रु. ६) सोन्याचे रिंग जोड लहान मोठ एकूण ६ वजन ४.४६० ग्रॅम की. २३,०००/- रु. ७) सोन्याचे दोन डोरले व २६ मनी - वजन ३.९८० ग्रॅम की. २०,०००/- रु. ८) सोन्याचे बेसर - वजन ०.४४० ग्रॅम की. २,०००/- रु. ९) चांदीचे २ पायल, चांदीची

चेन २ नग, चांदीचे ४ लोकेट, एक चांदीची अंगठी, एक चांदीचा तुकडा वजन ६३.०० ग्रॅम की. ३,६००/- रु. १०) एक जांभळा रंगाचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल की १०,०००/- रु. ११) एक निळा रंगाचा ओ पो कंपनीचा मोबाईल की ५,०००/- रु. १२) एक लाल काळया रंगाचा कार्बन कंपनीचा मोबाईल की १,०००/- रु. १३) एक लाल काळया रंगाचा कार्बन कंपनीचा मोबाईल की १,०००/- रु. १४) एक  काळया रंगाचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल की १,०००/- रु. १५) एक  काळया रंगाचा नोकिया कंपनीचा मोबाईल की १,०००/- रु. १६) एक सिल्वर रंगाचा प्लास्टिक कवर असलेला मोबाईलच्या आकाराचा इलेक्ट्रॉनिक वजन काटा की ५००/- रु. १७) एक निळया प्लॅस्टिक मुठीचा लोखंडी षटकोणी आकाराचे टोकदार हत्यार की १०/- रु. १८) एक राखडी रंगाचा फायबर मूठ असलेला पेचकस की १०/- रु. १९) एक पांढऱ्या रंगाचे लोखंडी पाते असलेले कटर की १०/- रु. २०) दोन निवडणुक ओळख पत्र, एक प्यान कार्ड व ड्रायव्हिंग लायसन्स, मोबाईल खरेदी केल्याचे बिल, २१) काचकूरि भूकटीच्या ७ पुड्या, २२) एक कथीय्या रंगाची लेदर पर्स किंमत १००/- रु. २३) नगदी रोख १,१०,६००/- असा एकूण जुमला किंमत २, ९८,७३०/- रु चा माल जप्त करून गुन्हा उघडकीस आणला.

सदर कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्धा श्री पियुष जगताप यांचे निर्देशाप्रमाणे मा. पोलीस निरीक्षक श्री संजय गायकवाड, पोलीस निरीक्षक सत्यविर बंडीवार यांचे निर्देशाप्रमाणे सहा. पोलीस निरीक्षक महेंद्र इंगळे, पोलीस उपनिरीक्षक गोपाल ढोले, पोलीस उपनिरीक्षक सौरभ घरडे पोलीस अंमलदार अशोक साबळे, निरंजन वरभे, नरेंद्र डहाके, चंद्रकांत बुरंगे, राजेश तीवस्कर, प्रमोद पिसे, श्रीकांत खडसे, रामकिसन इप्पर, महिला पोलीस शाहीन सय्यद, शुभांगी पुसदेकर, स्मिता महाजन सायबर सेलचे निलेश कट्टोजवार, दिनेश बोथकर, अनुप कावळे, अक्षय राऊत, विशाल मडावी, अंकित जीभे, सायबर पथक यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.